# <u>गोपनीय</u>

क्रमांक : का.स./बैठक/२२६

**मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,**
**वांद्रे-कुर्ला समूह, वांद्रे (पूर्व),**
**मुंबई - ४०० ०५१.**

दिनांक : १७ मार्च, २००९.

मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक २६ फेब्रुवारी, २००९ रोजी झालेल्या २२६ व्या बैठकीच्या कार्यवृत्ताची प्रत सोबत पाठवित आहे.

प्रसि १६-३-२००९

**सचिव,**
**कार्यकारी समिती**

**प्रति :**

| | | |
|---|---|---|
| मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर,<br>"प्रिया", वरळी सी फेस, वरळी,<br>मुंबई - ४०० ०१८. | - | सदस्य |
| श्री.एन्.व्ही.मिराणी<br>ए/४७, आदर्श नगर,<br>वरळी, मुंबई - ४०० ०२५ | - | सदस्य |
| डॉ.शिरीष संख्ये<br>संचालक,<br>मॅकेन्सी अँड कंपनी, एक्सप्रेस टॉवर,<br>२१ वा मजला, नरिमन पॉईंट,<br>मुंबई - ४०० ०२१ | - | सदस्य |
| प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन, मंत्रालय,<br>मुंबई - ४०० ०३२. | - | सदस्य |

..२/-

महापालिका आयुक्त, - सदस्य
बृहन्मुंबई महानगरपालिका,
मुंबई - ४०० ००१.

सचिव, - सदस्य
गृहनिर्माण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

व्यवस्थापकीय संचालक - सदस्य
सिडको,
निर्मल, नरीमन पॉईंट,
मुंबई - ४०० ०२३.

महानगर आयुक्त - सदस्य
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.

**निमंत्रित :**

सचिव,
नगर विकास विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

प्रधान सचिव (उद्योग),
उद्योग, उर्जा व कामगार विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग,
महाराष्ट्र शासन, मंत्रालय,
मुंबई - ४०० ०३२.

**प्रत अग्रेषित :-**

विधी सल्लागार, मुं.म.प्र.वि.प्राधिकरण.
मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकारी

# मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या
# कार्यकारी समितीच्या २२६ व्या बैठकीचे कार्यवृत्त

**दिनांक** : २६ फेब्रुवारी, २००९ (गुरुवार)

**वेळ** : संध्याकाळी ५.०० वाजता

**सभास्थान** : **मा.मुख्य सचिव यांचे समिती कक्ष,**
**५ वा मजला, मंत्रालय,**
**मुंबई - ४०० ०३२.**

उपस्थित सदस्य :

| | | |
|---|---|---|
| श्री.जॉनी जोसेफ<br>मुख्य सचिव,<br>महाराष्ट्र शासन | - | अध्यक्ष |
| श्री.द.म.सुकथनकर | - | सदस्य |
| श्री.एन्.व्ही.मिराणी | - | सदस्य |
| डॉ.शिरीष संख्ये | - | सदस्य |
| श्री.टी.सी.बेंजामिन<br>प्रधान सचिव,<br>नगर विकास विभाग,<br>महाराष्ट्र शासन | - | सदस्य |
| डॉ.ज.मो.फाटक<br>महापालिका आयुक्त,<br>बृहन्मुंबई महानगरपालिका | - | सदस्य |
| श्री.जी.एस.गील<br>व्यवस्थापकीय संचालक,<br>सिडको | - | सदस्य |
| श्री.रत्नाकर गायकवाड<br>महानगर आयुक्त | - | सदस्य |

**निमंत्रित :**

श्री.मनु कुमार श्रीवास्तव
सचिव, नगर विकास विभाग,
व सचिव (विशेष प्रकल्प),
सामान्य प्रशासन विभाग (अतिरिक्त कार्यभार)
महाराष्ट्र शासन

श्रीमती वल्सा नायर सिंग
सचिव,
पर्यावरण विभाग,
महाराष्ट्र शासन

श्री.मिलिंद म्हैसकर
अतिरिक्त महानगर आयुक्त / प्रकल्प संचालक,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.के.एन.पटेल
विधी सल्लागार,
मुं.म.प्र.वि. प्राधिकरण

डॉ.सतीश बागल
वित्त सल्लागार,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.पी.आर.के.मुर्ती
प्रमुख, परिवहन व दळणवळण विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.श्री.र.नंदर्गीकर
मुख्य अभियंता,
अभियांत्रिकी विभाग,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.सु.बा.नागे
मुख्य अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ

श्री.अ.रा.वानखडे
उप महानगर आयुक्त,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.दिलीप कवठकर
सह प्रकल्प संचालक (जनसंपर्क)
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

श्री.प्र.सि.तायडे
सचिव, कार्यकारी समिती,
मुं.म.प्र.वि.प्राधिकरण

**बाब क्र.१ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या २२५ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करणे.**

१.१ प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या २२५ व्या बैठकीचे कार्यवृत्त कायम करताना कार्यकारी समितीच्या सदस्यांनी आपले विचार व्यक्त केले की, मा.उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, स्कायवॉकवर दुकानांचे बांधकाम करण्यात येऊ नये. तसेच जेथे जेथे शक्य असेल तेथे तेथे दुकानांचे बांधकाम करण्यात यावे. सदस्यांनी असेही मत व्यक्त केले की, मा.उच्च न्यायालयाने असा निर्णय दिला आहे की, स्कायवॉकचे बांधकाम करताना आजूबाजूच्या परिसरातील लोकांना काही अडचणी निर्माण होऊ नयेत त्याबाबतची दक्षता घेण्यात यावी.

१.२ त्यानंतर, बैठकीचे कार्यवृत्त कायम करण्यात आले.

**बाब क्र.२ : प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या २२५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवाल.**

२.१ प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या दिनांक १६ ऑक्टोबर, २००८ रोजी झालेल्या २२५ व्या बैठकीच्या कार्यवृत्तावरील कार्यवाही अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

२.२ श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य कार्यकारी समिती यांनी बाब क्र.१ आणि बाब क्र.२ बाबत खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत :-

(अ) बाब क्र.३ : **मुंबई महानगर प्रदेशांतर्गत विविध रेल्वे स्थानकांच्या परिसरात २२ स्कायवॉक बांधकामांच्या निविदांना मान्यता मिळणेबाबत.**

सल्लागारांना अधिकार –

अर्हतापूर्व समितीकरीता, विविध विकास कामांकरीता आणि सल्लागारांच्या नेमणूकीकरीता तसेच निविदा छाननीकरीता समिती गठीत करण्यात यावी. या समितीमध्ये एक बाहेरील तज्ञाचा समावेश करण्यात यावा. या कामासाठी सर्वश्री.जी.के.देशपांडे, एस.आर.तांबे, व्ही.डी.बोरकर आणि पी.एल.बोंगीरवार या तज्ञांची नावे श्री.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सूचित केलेली आहेत. यापैकी एका तज्ञाचा समितीमध्ये समावेश करण्याची त्यांनी शिफारस केली.

(ब) बाब क्र.१० : **मे.इंडियन रजिस्टार ऑफ शिपिंग यांची स्कायवॉकच्या बांधकामासाठी तांत्रिक तपासणी सल्लागार (प्रुफ चेकींग कन्सल्टंट) म्हणून नेमणूकीसाठी मान्यता मिळणेबाबत.**

गुणवत्ता लेखापरीक्षकाच्या कामामध्ये अनुपालनाच्या पडताळणीचा समावेश करण्यात यावा. या आधीच्या लेखापरीक्षक अहवालात वैगुण्य दिसले असता त्याचा सुध्दा समावेश गुणवत्ता लेखापरीक्षकाच्या कामात करण्यात यावा.

**बाब क्र.३ : वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जी", "जी-टेक्स्ट" व "जीएन" ब्लॉक येथील रस्त्यांचे कॉंक्रीटीकरण करण्याचे कामासाठी प्रशासकीय मान्यता व निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

३.१ महानगर आयुक्तांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे वांद्रे-कुर्ला संकुलासाठी विशेष नियोजन प्राधिकरण असून येथील पायाभूत

सुविधा पुरविणे ही प्राधिकरणाची जबाबदारी आहे. सदर पायाभूत सुविधा अंतर्गत रस्त्याची कामे, जलवाहिन्या टाकण्याची कामे, मलनिःसारण, पावसाळी पाणी वाहून नेण्यासाठी गटारे इत्यादींचा समावेश आहे. सदर कामे प्राधिकरणाने टप्प्याटप्प्याने पूर्ण केली आहेत. वांद्रे-कुर्ला संकुलातील आय.सी.आय.सी.आय., नाबार्ड, एन.एस.सी., आय.एल. अँड एफ.एस., सिटी बँक इत्यादि मान्यवर वित्तीय संस्थांची कार्यालये कार्यरत आहेत. तसेच संकुलातील मैदाने ही प्रदर्शने तसेच निरनिराळे कार्यक्रम करण्यासाठी भाडयाने देण्यात येतात. परिणामी संकुलात येणा-या विविध स्तरातील लोकांच्या संख्येत वाढ झाली आहे. भारत डायमंड समूहाची नवीन इमारत, अमेरिकन दूतावासाची नवीन इमारत तसेच सर्व सुविधायुक्त आधुनिक सुविधा केंद्र इत्यादी नियोजित असून या रस्त्यावर परदेशी विशेष महत्वाच्या व्यक्ती वारंवार भेट देण्याची शक्यता आहे. विशेष नियोजन प्राधिकरण या नात्याने सध्या कार्यरत असलेल्या वित्तीय कार्यालयांसाठी योग्य दर्जाचे टिकाऊ रस्ते उपलब्ध व्हावेत या दृष्टीने प्राधिकरणातर्फे वांद्रे-कुर्ला संकुलातील 'जी', 'जी-टेक्स्ट' व 'जीएन' ब्लॉक येथील सध्याच्या डांबरी रस्त्यांचे पृष्ठभाग पावसाळयात वारंवार खराब होतात व हे रस्ते १० वर्षापूर्वी बांधण्यात आलेले आहेत व त्यामुळे या रस्त्याचे कॉंक्रीटीकरण करणे आता आवश्यक झालेले आहे. महानगर आयुक्तांनी या बाब टिपण्णीबाबत माहिती देताना असेही सांगितले की, सदर प्रस्तावित कामे नंतर केल्यास रस्त्यांचे देखभालीसाठी पूर्व मागणीप्रमाणे खर्च सोसावा लागेल. या रस्त्याच्या कामासोबतच पायाभूत सुविधांसाठीची मार्गिका (Utility Duct) सुध्दा प्रस्तावित असल्याने भविष्यात कोणत्याही कारणासाठी रस्ते खोदण्याची गरज भासणार नाही. सदर बाबीमध्ये ५ रस्त्यांच्या बांधकामाचा समावेश करण्यात आला असून सदर प्रस्तावामध्ये सुमारे १० कि.मी. लांबीच्या रस्त्यांच्या २ व ४ पदरी मार्गीकेचे कॉंक्रीटीकरण करावयाचे आहे. सदर मजबूतीकरणाच्या ५ रस्त्यांच्या कामाची एकूण अंदाजित किंमत सुमारे रु.१२१.६० कोटी इतकी आहे. सदर कामाची अंदाजपत्रके सध्या असलेल्या सार्वजनिक बांधकाम विभाग मुंबई महानगरपालिका यांच्या (२००७-०८ च्या) व प्रमुख बांधकाम साहित्यांच्या सध्या प्रचालित दरानुसार तयार करण्यात आले आहेत.

३.२ महानगर आयुक्तांनी ५ रस्त्यांच्या कामांसाठीची माहिती खालीलप्रमाणे दिली –

**काम क्र.१ कामाचे नाव - वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जी" ब्लॉक येथील ३० मी. रुंद रस्त्याच्या काँक्रीटीकरण करणेचे काम.**

या कामाची अंदाजित रक्कम सुमारे रु.४१,२०,६३,५००/-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदाराचा देकार | देकाराची रक्कम (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे.अशोका बिल्डकॉन लि. | (+) ७.२०% जास्त दराने | ४४,१७,३२,०७२.०० | द्वितीय लघुत्तम |
| २. | मे.महावीर रोडस् अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | (+) ११.२५% जास्त दराने | ४५,८४,२०,६४३.७५ | चतुर्थ लघुत्तम |
| ३. | मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | (+) ५.४०% जास्त दराने | ४३,४३,१४,९२९.०० | प्रथम लघुत्तम |
| ४. | मे.युनिटी इन्फ्राप्रोजेक्ट लि. | निविदा उघडण्यात आली नाही. | – | – |
| ५. | मे.वालेचा इंजिनियरींग लि. | (+) ९.९०% जास्त दराने | ४५,२८,५७,७८६.५० | तृतीय लघुत्तम |

याबाबत ५ कंत्राटदारांनी निविदा सादर केल्या होत्या. मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर लिमिटेड यांचा देकार लघुत्तम म्हणजेच ५.४०% इतका अधिक दराचा आहे. त्यांना हा देकार पुन्हा कमी करण्याची विचारणा केली असता त्यांनी ४.४४% इतक्या अधिक दराने काम करण्याचे मान्य केले आहे. मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा ४.४४% इतक्या अधिक दराचा सुधारीत देकार लघुत्तम सुसंवादीत व स्विकृत करण्याजोगा असल्याने हा देकार मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**काम क्र.२ कामाचे नाव - वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जी" ब्लॉक येथील २४ मी. रुंद रस्त्याच्या काँक्रीटीकरण करणेचे काम.**

या कामाची अंदाजित रक्कम रु.२१,५२,४३,४००/-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदाराचा देकार | देकाराची रक्कम (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे.अशोका बिल्डकॉन लि. | (+) ११.५०% जास्त दराने | २३,९९,९६,३९१.०० | तृतीय लघुत्तम |
| २. | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. | (+) ९.५०% जास्त दराने | २३,५६,९१,५२३.०० | द्वितीय लघुत्तम |

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदाराचा देकार | देकाराची रक्कम (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| ३. | मे.महावीर रोडस् ॲड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | (+) ९.००% जास्त दराने | २३,४६,१५,३०६.०० | प्रथम लघुत्तम |
| ४. | मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | (+) ९.००% जास्त दराने | २३,४६,१५,३०६.०० | प्रथम लघुत्तम |
| ५. | मे.युनिटी इन्फ्राप्रोजेक्ट लि. | निविदा उघडण्यात आली नाही. | - | - |
| ६. | मे.वालेचा इंजिनियरींग लि. | (+) १४.००% जास्त दराने | २४,५३,७७,४७६.०० | चतुर्थ लघुत्तम |

सदर कामासाठी मे.महावीर रोडस् ॲड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांची व मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. या दोघांची ९% जास्त दराची निविदा लघुत्तम आढळल्याने या दोन्ही निविदाकारांकडून पुन्हा दिनांक २५/०८/२००८ रोजी सकाळी ११.०० वाजेपर्यंत सिलबंद लिफाफ्यावर देकार मागविण्यात आले. सदर देकार उघडले असता मे.महावीर रोडस् ॲड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा ४.९९% जादा दराचा प्रस्ताव, मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांच्या ५.४०% जादा दराने या देकारापेक्षा कमी व न्युनतम आढळला. तद्नंतर मे.महावीर रोडस् ॲड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांना पुन्हा त्यांचे दर कमी करण्याविषयी दिनांक २५ ऑगस्ट, २००८ रोजी विचारणा केली होती. त्यानुसार मे.महावीर रोडस् ॲड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा सुधारीत लघुत्तम देकार (+) ४.४७% इतक्या अधिक दराचा आहे. मे.महावीर रोडस् ॲड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांनी सादर केलेला (+) ४.४७% इतक्या अधिक दराचा सुधारीत देकार लघुत्तम सुसंवादीत व स्विकृत करण्याजोगा असल्याने हा देकार मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**काम क्र.३ कामाचे नाव - <u>वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जी" ब्लॉक येथील १८ मी.रुंद रस्त्याच्या कॉंक्रीटीकरण करणेचे काम.</u>**

**या कामाची अंदाजित रक्कम रु.२३,६५,४८,२६०/-**

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदाराचा देकार | देकाराची रक्कम (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे.अशोका बिल्डकॉन लि. | (+) ११.५०% जास्त दराने | २६,३७,५१,३०९.९० | जास्तीत जास्त किंमतीची |
| २. | मे.जे.कुमार इन्फ्राप्रोजेक्ट लि. | (+) ७.५०% जास्त दराने | २५,४२,८९,३७९.५० | द्वितीय लघुत्तम |
| ३. | मे.महावीर रोडस् ॲड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | (+) ६.४०% जास्त दराने | २५,१६,८७,३४८.६४ | प्रथम लघुत्तम |

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदाराचा देकार | देकाराची रक्कम (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| ४. | मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | (+) ९.००% जास्त दराने | २५,७८,३७,६०३.४० | चतुर्थ लघुत्तम |
| ५. | मे.युनिटी इन्फ्राप्रोजेक्ट लि. | निविदा उघडण्यात आली नाही. | - | - |
| ६. | मे.वालेचा इंजिनियरींग लि. | (+) ८.००% जास्त दराने | २५,५४,७२,१२०.८० | तृतीय लघुत्तम |

मे.महावीर रोडस् ॲड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा देकार लघुत्तम म्हणजेच ६.४०% इतका अधिक दराचा आहे. त्यांना हा देकार पुन्हा कमी करण्याची विचारणा केली असता, त्यांनी (+) ४.५१% अधिक इतक्या दराने काम करण्याचे मान्य केले आहे. मे.महावीर रोडस् ॲड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. यांचा ४.५१% इतक्या अधिक दराचा सुधारीत देकार लघुत्तम सुसंवादीत व स्विकृत करण्याजोगा असल्याने हा देकार मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**काम क्र.४ कामाचे नाव - <u>वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी-टेक्स्ट" ब्लॉक येथील २४ मी. व ३० मी.रुंद रस्त्याच्या काँक्रीटीकरण करणेचे काम.</u>**

या कामाची अंदाजित रक्कम रु.२०,५७,४०,७६०/-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदाराचा देकार | देकाराची रक्कम (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे.अशोका बिल्डकॉन लि. | (+) ७.७०% जास्त दराने | २२,१५,८२,७९८.५२ | तृतीय लघुत्तम |
| २. | मे.महावीर रोडस् ॲड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | (+) ६.७५% जास्त दराने | २१,९६,२८,२६१.३० | द्वितीय लघुत्तम |
| ३. | मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | (+) ९.००% जास्त दराने | २२,४२,५७,४२८.४० | चतुर्थ लघुत्तम |
| ४. | मे.वालेचा इंजिनियरींग लि. | (+) ४.५०% जास्त दराने | २१,४९,९९,०९४.२० | प्रथम लघुत्तम |

मे.वालेचा इंजिनियरींग लि. यांचा देकार लघुत्तम म्हणजेच ४.५०% इतका अधिक दराचा आहे. त्यांना हा देकार पुन्हा कमी करण्याची विचारणा केली असता त्यांनी सदरचा देकार हा कामाच्या आवाक्यानुसार कमी करणेची असमर्थता दर्शविताना त्यांचा देकार ४.५०% इतक्या अधिक दरापेक्षा कमी करण्याचे मान्य केले नाही. मे.वालेचा इंजिनियरींग लि. यांनी जास्त दरासाठी नमूद केलेली कारणे बघता यांचा ४.५०% इतक्या अधिक दराचा देकार लघुत्तम सुसंवादीत व स्विकृत करण्याजोगा असल्याने हा देकार मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

काम क्र.५ कामाचे नाव - वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी-एन" ब्लॉक येथील २५ मी. व १५ मी. रुंद रस्त्याच्या कॉंक्रीटीकरण करणेचे काम.

या कामाची अंदाजित रक्कम रु.१४,६३,४४,६२०/-

| अ.क्र. | कंत्राटदाराचे नाव | कंत्राटदाराचा देकार | देकाराची रक्कम (रुपये) | शेरा |
|---|---|---|---|---|
| १. | मे.अशोका बिल्डकॉन लि. | (+) ६.३०% जास्त दराने | १५,५५,६४,३३१.०६ | प्रथम लघुत्तम |
| २. | मे.दोलचंद कालाजी | निविदा उघडण्यात आली नाही. | - | - |
| ३. | मे.महावीर रोडस् अॅंड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | (+) ९.७५% जास्त दराने | १६,०६,१३,२२०.४५ | तृतीय लघुत्तम |
| ४. | मे.पी.बी.ए.इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | (+) ९.००% जास्त दराने | १५,९५,१५,६३५.८० | द्वितीय लघुत्तम |
| ६. | मे.वालेचा इंजिनियरींग लि. | (+) ११.००% जास्त दराने | १६,२४,४२,५२८.२० | चतुर्थ लघुत्तम |

मे.अशोका बिल्डकॉन लि. यांचा देकार लघुत्तम म्हणजेच ६.३०% इतका अधिक दराचा आहे. त्यांना हा देकार पुन्हा कमी करण्याची विचारणा केली असता त्यांनी ४.४१% इतक्या अधिक दराने काम करण्याचे मान्य केले आहे. मे.अशोका बिल्डकॉन लि. यांचा ४.४१% इतक्या अधिक दराचा सुधारीत देकार लघुत्तम सुसंवादीत व स्विकृत करण्याजोगा असल्याने हा देकार मंजूर करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

३.३ श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी वांद्रे-कुर्ला संकुलातील रस्त्यांच्या कॉंक्रीटीकरणाबाबत खालील मुद्दे उपस्थित केलेले आहेत :-

अ) सल्लागारांचा अधिकार - कंत्राटदाराने दिलेल्या सहा कारणांचा विचार अंदाजपत्रक करतानाच का करता आला नाही.

ब) रस्त्यांच्या संकल्पचित्राचे पुनर्विलोकन करण्यात यावे.

क) या कामासाठी गुणवत्ता लेखापरीक्षकाची नेमणूक करण्यात यावी

३.४ डॉ.शिरीष संख्ये, सदस्य, कार्यकारी समिती यांनी याबाबत असे मत व्यक्त केले की, सध्या आर्थिक मंदी असून स्टील, सिमेंटच्या भावामध्ये घट झालेली आहे.

**३.५** याबाबत महानगर आयुक्त यांनी असे विषद केले की, अंदाजपत्रकामध्ये सर्व स्थानिक बाबींचा तंतोतंत अंतर्भाव करणे शक्य नाही आणि सदर बाबी सर्वसाधारणपणे दरसूचीमध्ये समाविष्ट केलेल्या असतात. परंतू निविदेमध्ये योग्य इतकी स्पर्धा झाली किंवा नाही हे बघणे मात्र क्रमप्राप्त आहे. अशा स्पर्धांनुसार प्राप्त झालेल्या निविदा प्रत्यक्ष बाजारभावानुसार योग्य समजणे उचित राहील. सदर बाबी श्री.गील, व्यवस्थापकीय संचालक, सिडको आणि डॉ.ज.मो.फाटक, महापालिका आयुक्त यांनी मान्य केली.

**३.६** त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन खालील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. १११२</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे-कुर्ला संकुलातील "जी", "जी-टेक्स्ट" व "जीएन" हया तीन ब्लॉकमधील रस्त्याच्या कॉंक्रिटीकरणाच्या खालील तक्त्यात दर्शविलेल्या कामांसाठी रु.१२१.६० कोटी इतक्या अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे. तसेच या कामासाठी खालील तक्त्यात दर्शविलेल्या निविदाकारांच्या न्युनतम निविदा स्विकारण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे :-

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (रु.) | लघुत्तम निविदाकाराचे नांव | लघुत्तम देकार | देकाराची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १. | वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जी" ब्लॉक येथील ३० मी. रुंद रस्त्याच्या कॉंक्रिटीकरण करणेचे काम. | ४१,२०,६३,५००/- (रु.४१.२१ कोटी) | मे.पीबीए इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | ४.४४% अधिक दराने | ४३,०३,५९,११९.४० |

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकीय किंमत (रु.) | लघुत्तम निविदाकाराचे नांव | लघुत्तम देकार | देकाराची रक्कम (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| २. | वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जी" ब्लॉक येथील २४ मी. रुंद रस्त्याच्या काँक्रिटीकरण करणेचे काम. | २१,५२,४३,४००/- (रु.२१.५२ कोटी) | मे.महावीर रोडस् अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | ४.४७% अधिक दराने | २२,४८,६४,७७९.९८ |
| ३. | वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जी" ब्लॉक येथील १८ मी. रुंद रस्त्याच्या काँक्रिटीकरण करणेचे काम. | २३,६५,४८,२६०/- (रु.२३.६६कोटी) | मे.महावीर रोडस् अँड इन्फ्रास्ट्रक्चर प्रा.लि. | ४.५१% अधिक दराने | २४,७२,१६,५८६.५३ |
| ४. | वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जीटेक्स्ट" ब्लॉक येथील २४ मी. व ३० मी. रुंद रस्त्याच्या काँक्रिटीकरण करणेचे काम. | २०,५७,४०,७६०/- (रु.२०.५७ कोटी) | मे.वालेचा इंजिनियरींग लि. | ४.५०% अधिक दराने | २१,४९,९९,०९४.२० |
| ५. | वांद्रे-कुर्ला संकुलामधील "जीएन" ब्लॉक येथील २५ मी. व १५ मी. रुंद रस्त्याच्या काँक्रिटीकरण करणेचे काम. | १४,६३,४४,६२०/- (रु.१४.६३ कोटी) | मे.अशोका बिल्डकॉन लिमिटेड | ४.४१% अधिक दराने | १५,२७,९८,४१७.७४ |

एकूण अंदाजित रक्कम रु.१२१.६० कोटी

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.४</u> : <u>मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत मुलुंड चेकनाका ते सायन पूर्व द्रुतगती महामार्गाचे रुंदीकरण व सुधारणा करणे या कामावरील अस्तित्वातील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना मुदतवाढ देणे व वाढीव फी मंजूर करणेबाबत.</u>**

४.१ महानगर आयुक्तांनी याबाबत परिच्छेद क्र.१ व २ मधील माहिती सांगितली. मुंबई नागरी

पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गाचे रुंदीकरण व नुतनीकरणाचे काम पूर्णत्वाच्या मार्गावर आहे. सदर महामार्गावर पश्चिम बाजूस बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ३००० मि.मी. व्यासाच्या जलवाहिनीचे काम प्रगतीपथावर असल्याने महामार्गाच्या पश्चिम बाजूकडील सेवारस्त्याचे काम विहित कालावधीत पूर्ण करणे शक्य नव्हते. जलवाहिनीचे काम बहुतांश ठिकाणी पूर्ण झाले असून तेथील सेवारस्त्याचे बांधकाम प्रगतीपथावर आहे. तसेच रस्त्यावरील वाहतूक वर्दळ विचारात घेता व सन २००५ मधील अतिवृष्टीमुळे झालेली रस्त्याची हानी लक्षात घेता मा.उच्च न्यायालयाच्या आदेशाप्रमाणे रस्ते टिकाऊ व खड्डे विरहीत होण्यासाठी मास्टीक अस्फाल्ट वेअरिंग कोट करण्याची तरतूद करण्यात आली असून सदरील काम सुध्दा प्रगतीपथावर आहे.

४.२ महामार्गाचे रुंदीकरण व सुधारणा करणे या कामासाठी कार्यकारी समितीच्या दि.२०.०२.२००३ रोजी झालेल्या २०० व्या बैठकीत, मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाअंतर्गत राबविण्यात येणा-या कामांसाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची नेमणूक करण्यास मंजूरी देण्यात आली आहे. त्यानुरुप विहित अर्हता प्राप्त एकूण ४० सल्लागारांची यादी अंतिम करण्यात आली आहे. पूर्व द्रुतगती महामार्गाच्या मूळ कामामध्ये झालेल्या विलंबामुळे संबंधित कंत्राटदारांना दि.३१/०१/२००८ पर्यंत मुदतवाढ देण्यात आलेली आहे. त्याच अनुषंगाने या प्रकल्पावरील प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना सुध्दा मुदतवाढ मिळणे अपेक्षित होते. त्या अनुषंगाने कार्यकारी समितीच्या २१० व्या बैठकीत सल्लागार यादीची वैधता डिसेंबर, २००५ पर्यंत वाढविण्यात आली. तद्नंतर वाहतूक व दळणवळण विभागाचे प्रमुख यांच्या दिनांक ०५/०४/२००७ च्या पत्रान्वये तसेच महानगर आयुक्त यांना प्रदान करण्यात आलेल्या अधिकारान्वये प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना जून, २००७ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली. त्यानंतर कार्यकारी समितीच्या २२० व्या बैठकीमध्ये ठराव क्र.१०६३ अन्वये प्रकल्पावरील सर्व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांच्या प्रस्तावाची वैधता डिसेंबर, २००७ अखेरपर्यंत वाढविण्यात आली.

४.३ सद्यस्थितीत पूर्व द्रुतगती महामार्गावर सुरु असलेले रुंदीकरणाचे काम बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या ३००० मि.मी. व्यासाच्या पाणीपुरवठा वाहिनीच्या प्रलंबित कामामुळे पूर्ण करता

आले नाही. मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाच्या निकषाप्रमाणे प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने काही अतिरिक्त कामे अंतर्भूत करावी लागल्यामुळे कार्यकारी समितीच्या दि.०८/११/२००७ च्या २२२ व्या बैठकीत या कामाच्या रु.१८८.९७ कोटी इतक्या सुधारीत अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आली. याच बैठकीमध्ये पॅकेज क्र.११ मधील काम पूर्ण झालेले असल्याने उर्वरीत पॅकेजमधील कामे पूर्वबंध न करता सन २००६-०७ च्या सार्वजनिक बांधकाम विभागाच्या दरसूचीनुसार पूर्ण करण्यास मूळ कंत्राटदार तयार झाल्यास त्यांच्याकडून प्रस्ताव घेऊन त्यांना सदर कामे देण्याबाबत तसेच मूळ कंत्राटदाराच्या निविदा कमी दराच्या असतील तर सुधारीत दरसूचीवर तेवढयाच दराने काम करण्याचा प्रस्ताव मूळ कंत्राटदाराकडून प्राप्त झाल्यास त्यांना कामे देण्यात येतील असा निर्णय घेण्यात आला. त्या अनुषंगाने ही सर्व कामे आता प्रगतीपथावर असल्यामुळे संबंधित प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांना सुध्दा मुदतवाढ देणे आवश्यक आहे.

४.४ मे.शिरीष पटेल ॲन्ड असोसिएटस् प्रा.लि. यांना पॅकेज क्र.११ च्या मूळ कामात दिलेल्या मुदतवाढीच्या कालावधीतील रु.४६.३२ लाख एवढया वाढीव फी चे प्रदान करण्यासाठी मान्यता देण्याची विनंती आहे. त्यानंतर पॅकेज क्र.११ मधील उर्वरीत कामासाठी त्यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून केलेली नेमणूक नियमित करणे व त्या पोटी त्यांना रु.५३.०० लाख एवढी फी प्रदान करण्यास कार्यकारी समितीला सदर प्रस्ताव सादर केलेला आहे. तसेच घाटकोपर ते मुलुंड चेक नाका पॅकेज क्र.१२ ते १५ या कामाचे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार मे.विल्बर स्मिथ ॲन्ड असोसिएटस् प्रा.लि. यांना दि.१५/०५/२००८ पर्यंत मुदतवाढ देण्यास व वाढीव फी पोटी रु.१२१ लाख प्रदान करण्याचा प्रस्तावसुध्दा करण्यात येत आहे..

४.५ याबाबत चर्चा करताना श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांच्या प्रश्नाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सल्लागारांची वाढीव फी नुसार ठरविण्यात आली. तसेच ज्या काळामध्ये कंत्राटदारांचे काम चालू नाही अशा कालावधीमध्ये man month वर आधारीत फी प्रस्तावित करण्यात आली नाही.

..१४/-

४.६ वरील बाबीवर सविस्तर चर्चा झाल्यानंतर कार्यकारी समितीने खालील ठराव मंजूर केला.

ठराव क्र. ११९३ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे खालीलप्रमाणे प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारास मुदतवाढ देण्यास व करारनाम्यातील अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य आर्थिक बदलासह अधिदान करण्यास मान्यता देत आहे :-

| अ.क्र. | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागाराचे नांव | कामाचे नांव | | प्रकल्प व्यवस्थापन सल्लागारांची मान्य फी | प्रस्तावित मुदतवाढ | करारनाम्यानुसार देय होणारी रक्कम |
|---|---|---|---|---|---|---|
| | | कामाची व्याप्ती | कामाची किंमत | | | |
| १. | मे.शिरिष पटेल अँड असोसिएट्स कन्सल्टंट प्रा. लि. | (अ) मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गाचे सायन ते घाटकोपर पॅकेज क्र.११ चे रुंदीकरण व सुधारणा करणे | रु.३०.५५ कोटी | २.५०% रु.७६.०० लाख | — | रु.१२२.६९ लाख |
| | | (ब) मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गाचे सायन ते घाटकोपर पॅकेज क्र.११ चे उर्वरित व अतिरिक्त कामे. | रु.२१.१६ कोटी | २.५०% रु.५३.०० लाख | दिनांक ३०.४.२००८ | रु.५३.०० लाख |
| २. | मे.विल्बर स्मिथ अँड असोसिएट्स प्रा.लि. | मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत पूर्व द्रुतगती महामार्गाचे घाटकोपर ते मुलुंड चेकनाका पॅकेज क्र.१२ ते १५ चे रुंदीकरण व सुधारणा करणे. | रु.९३.९३ कोटी | १.२८% रु.१२०.०० लाख | दिनांक १५.५.२००८ | रु.२४१.०० लाख |

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.५ : दक्षिण मुंबईतील स्कायवॉकच्या बांधकामासाठी आंतरराष्ट्रीय सल्लागारांची नेमणूक करण्याबाबत.**

५.१ याबाबत महानगर आयुक्तांनी माहिती देताना असे सांगितले की, ५४ स्कायवॉकपैकी खालील ४ स्कायवॉक हे अतिशय महत्वाच्या वास्तुंच्या व कार्यालयांच्या परिसरात येत असून त्यांचा वापर परदेशी तसेच देशातील पर्यटकांकडून होणार आहे.

अ) चर्चगेट ते मंत्रालय (एल.आय.सी.इमारती मार्गे)
ब) विधानभवन ते रिगल सिनेमा
क) रिगल सिनेमा ते छत्रपती शिवाजी टर्मिनस
ड) छत्रपती शिवाजी टर्मिनस ते चर्चगेट

५.२ वरील पार्श्वभूमीवर या ४ स्कायवॉकची कामे आंतरराष्ट्रीय दर्जाची असणे गरजेचे आहे. त्यामुळे सदर स्कायवॉकच्या बांधकामासाठी मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने खालील आंतरराष्ट्रीय सल्लागारांची संक्षिप्त सूची (short-list) बनविली. सदर सूची बनविताना सदर सल्लागारांकडे असलेल्या आंतरराष्ट्रीय कामांचा पूर्वानुभव विचारात घेण्यात आला व त्यानंतर महानगर आयुक्तांची या संक्षिप्त सूचीला मान्यता घेण्यात आली.

अ) मे.दार कन्सल्टंट्स
ब) मे.अरुप कन्सल्टंट्स इंजिनिअर्स, लंडन
क) मे.अन्विकर कन्सल्टंट्स, जर्मनी
ड) मे.पी.जे.एस.आय.कन्सल्टंट्स, मलेशिया

५.३ मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने वरील आंतरराष्ट्रीय सल्लागारांकडून या विभागाच्या पत्र क्र.ED/SKW/Church/ACE/08/Engg.Divn., दिनांक ७ ऑगस्ट, २००८ अन्वये दरपत्रक मागविले होते. परंतु निविदा विहित मुदतीत प्राप्त न झाल्याने व मे.अन्विकर कन्सल्टंट्स,

जर्मनी व मे.पी.जे.एस.आय.कन्सल्टंट्स, मलेशिया यांच्या विनंतीनुसार दरपत्रक स्विकारण्याची मुदत दिनांक ८ सप्टेंबर, २००८ वरुन दि.१५ सप्टेंबर, २००८ पर्यंत वाढविण्यात आली होती. उपरोक्त ४ सल्लागारांपैकी फक्त मे.दार कन्सल्टंट्स (इं) प्रा.लि. आणि मे.अरुप कन्सल्टंट्स इंजिनिअर्स, लंडन यांचीच दरपत्रके प्राप्त झालेली आहेत. दिनांक ७ ऑगस्ट, २००८ रोजी प्राप्त झालेल्या पत्राच्या परिच्छेद क्र.५ नुसार मे.अरुप कन्सल्टंट्स इंजिनिअर्स, लंडन यांनी दिलेले दर हे अमेरिकी डॉलरमध्ये असल्याने त्यांची निविदा अपात्र ठरविणे क्रमप्राप्त आहे.

**५.४** या प्रस्तावावरील चर्चेच्या अनुषंगाने ६% फी जास्त असल्याचे मत डॉ.शिरीष संख्ये व श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी व्यक्त केले. श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी खालील दोन मुद्दे उपस्थित केलेले आहेत.

अ) या कामाच्या व्याप्तीमध्ये पर्यावरणाचा अभ्यास, वाहतूक आणि सुरक्षितता यांचे स्वरुपाचा समावेश करण्यात यावा.

ब) ६% खर्च हा अत्याधिक दिसून येत आहे.

**५.५** डॉ.ज.मो.फाटक, महापालिका आयुक्त यांनी असे सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या विविध कामामध्ये वास्तुशास्त्रज्ञांची फी सुध्दा सुमारे ७% एवढी असते. याबाबत चर्चेवरील उत्तरे देताना मुख्य अभियंता यांनी असे सादर केले की, सल्लागारांच्या फी मध्ये कामाचे सर्व नकाशे, संकल्पचित्रे तयार करणे याबरोबरच कामे सुरु असताना देखभाल करणे, वाहतूकविषयक बाबी इ. कामे अंतर्भूत आहेत. शिवाय तज्ञ सल्लागार आंतरराष्ट्रीय दर्जाचे असल्यामुळे त्यांची फी सर्वसाधारणपणे राष्ट्रीय सल्लागारांपेक्षा थोडी जास्त अपेक्षित असते. श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे सांगितले की, सदर फी वरळी-वांद्रे या पूलाच्या फी बरोबर तुलना करणे योग्य होणार नाही कारण या कामाचा वाव भिन्न असल्याचे मत त्यांनी प्रदर्शित केले. चर्चेअंती मुख्य सचिव यांनी सल्लागारांबरोबर वाटाघाटी करुन सदर फी ५% पर्यंत कमी होईल अशा सूचना केल्या. तसेच मंजूर फी कमी करण्यास सल्लागार तयार नसल्यास पुनःश्च प्रस्ताव मागविण्याचे आदेश दिले.

**बाब क्र.६ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक १ एप्रिल, २००८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००८.**

दिनांक १ एप्रिल, २००८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००८ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**बाब क्र.७ : वांद्रे (पूर्व) येथील स्कायवॉक वरील जाहिरातींचे हक्क देणेच्या बदल्यात दोन उद्‌वाहन, शौचालय वगैरे बसविणे व त्यांचेसह संपूर्ण स्कायवॉकची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन करणेची निविदा मंजूरीबाबत.**

७.१ याबाबत माहिती देताना महानगर आयुक्तांनी असे सांगितले की, सदरबाबतची टिपण्णी ही स्कायवॉकवरील जाहिरातींचे हक्क देण्याच्या बाबतीत असून मे.ॲडलॅब्स फिल्मस् लि. यांनी त्यांचा देकार हा रु.७९ कोटी दिलेला असून त्यांची निविदा मान्य करुन त्यांना स्विकृतीपत्र देण्यात आले आहे. मे.ॲडलॅब्स फिल्मस् लि. यांनी निविदेतील तरतूदीनुसार रु.७.९ कोटी इतक्या सुरक्षित अनामत रक्कमेचा भरणा केला आहे. डॉ.शिरीष संख्ये, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे विचार व्यक्त केले की, सदर निविदाकार हे या कामापासून माघार घेत आहेत. त्यामुळे त्यांनी याबाबतची देकाराची रक्कम भरण्यास असमर्थता दर्शविली आहे. या बैठकीमध्ये सर्वानुमते असे ठरविले की, ऑक्टोबर, २००८ पासून पुढील ६ महिन्यांच्या आत म्हणजे दिनांक ३१ मार्च, २००९ च्या आत त्यांनी ७९ कोटी रक्कम भरली पाहिजे. सदर रक्कम भरण्यास ते असमर्थ ठरले तर त्यांची ही सुरक्षित अनामत रक्कम जप्त करुन नव्याने निविदा मागविण्यात याव्यात. कार्यकारी समितीने या प्रस्तावास मान्यता दिली.

७.२ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. १११४ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (दोन) अन्वये प्राप्त झालेल्या

अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे वांद्रे (पूर्व) येथील स्कायवॉकवरील जाहिरातींचे हक्क १० वर्षांच्या कालावधीसाठी देणेच्या बदल्यात दोन उद्वाहन, शौचालय वगैरे बसविणे व त्यांचेसह संपूर्ण स्कायवॉकची देखभाल, दुरुस्ती व व्यवस्थापन त्या कालावधीसाठी करणेची व त्याचप्रमाणे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणास रक्कम रु.७९ कोटी अदा करणेची मे.ॲडलॅब्स फिल्म्स लि. यांची महत्तम निविदा स्विकारण्यास व मे.ॲडलॅब्स यांनी प्राधिकरणास अदा करावयाची रक्कम भरण्यासाठी ६ महिन्यांची मुदतवाढ ऑक्टोबर, २००८ ते दिनांक ३१ मार्च, २००९ पर्यंत देण्यास कार्यकारी समिती याद्वारे मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** निविदा पत्रातील अटी व शर्तीस अनुसरुन पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.८ : मुंबई महानगर प्रदेशात मोनो रेल व्यवस्था : मे.राईट्स लिमिटेड या सल्लागार संस्थेस कामाची व्याप्ती वाढवून ठाणे-भिवंडी-कल्याण या छन्नमार्गाचा सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी कार्योत्तर मंजूरी देणेबाबत.**

८.१ महानगर आयुक्तांनी या बाब टिपण्णीबाबत माहिती देताना असे सांगितले की, मे.राईटस् लि. यांनी जेकब सर्कल ते चेंबूर स्थानक, वडाळा भारवाहक तळमार्गे या छन्नमार्गावर प्रायोगिक तत्वावर प्रकल्प राबविण्यासाठी तांत्रिक व वित्तीय सुसाध्यता अहवाल तयार करुन प्राधिकरणास सादर केलेला आहे. महानगर आयुक्त यांनी अशीही माहिती दिली की, मोनोरेल हा बदलापूरपर्यंत विस्तारीत करण्यात यावा याबाबत प्राधिकरणाच्या सदस्यांनी मागणी केलेली आहे. याबाबत मा.मुख्यमंत्री व अध्यक्ष, प्राधिकरण यांनी प्राधिकरणाच्या दिनांक १५.१०.२००८ रोजीच्या १२३ व्या बैठकीत महानगर आयुक्तांना असे निर्देश दिले आहेत की, ठाणे-भिवंडी-कल्याण या छन्न मार्गाच्या सुसाध्यता अभ्यास करताना सदर मोनोरेलचा बदलापूरपर्यंतचा विस्तार करण्यासाठी

सुसाध्यता अभ्यास करण्यात यावा. त्यानुसार मे.राईट्स यांना सूचना देण्यात येतील की, त्यांनी सदर सुसाध्यता अभ्यास या अगोदर ठरवलेल्या रु.४ लाख प्रति कि.मी. या निर्धारीत केलेल्या शुल्कावर करण्यात यावे. तसेच याबाबतचा अहवाल प्राधिकरणास सादर करावा. त्यानंतर, कार्यकारी समितीने मे.राईटस् लि. यांच्या कामाची व्याप्ती वाढवून ठाणे, भिवंडी, कल्याण पर्यंतच्या अतिरिक्त छन्नमार्गाचा सुसाध्यता अभ्यास रु.१.६० कोटी + सेवाकर या फी वर करण्यासाठी कार्योत्तर मान्यता दिली.

८.२ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन खालील ठराव मंजूर केला :-

**<u>ठराव क्र. १११५</u> :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम(३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.राईट्स लिमिटेड यांच्या कामाची व्याप्ती वाढवून ठाणे-भिवंडी-कल्याण या अतिरिक्त छन्नमार्गाचा सुसाध्यता अभ्यास रु.१.६० कोटी + सेवा कर या फी वर करण्यासाठी कार्योत्तर मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**<u>बाब क्र.९</u> : <u>मोनोरेल प्रकल्पाचा बृहत आराखडा तयार करण्यासाठी मे.ली असोसिएट्स यांची सल्लागार म्हणून नेमणूक करणेबाबत.</u>**

९.१ महानगर आयुक्तांनी या विषयाबाबत माहिती देताना असे सांगितले की, सार्वजनिक जलद परिवहन सेवेला सहाय्यभूत व्हावी यासाठी आणि सार्वजनिक जलद वाहतूक यंत्रणा उपलब्ध नाहीत

किंवा या सेवा उपलब्ध करुन देणे शक्य नाही, जेथे अरुंद रस्ते व दुतर्फा असलेल्या बांधकामामुळे रस्ता रुंदीकरण शक्य नाही अशा मार्गिकांवर मोनोरेल (Mono Rail) योजना राबविण्याचा प्रस्ताव आहे.

९.२ महानगर आयुक्त यांनी असेही सांगितले की, मे.ली असोसिएटस् यांनी यापूर्वी मुंबई महानगर प्रदेशाचा सर्वंकष परिवहन अभ्यास पूर्ण केलेला असून या महानगर प्रदेशाबद्दल त्यांना सविस्तर माहिती दिलेली आहे. तसेच मे.ली असोसिएटस् यांनी सर्वंकष परिवहन अभ्यासाच्या अंतर्गत महामार्ग जाळे तसेच रेल मार्ग यासाठी रचनात्मक आराखडा आणि प्रकल्प राबविण्याचे टप्पे सूचविले आहेत. या अनुषंगाने मोनोरेल प्रकल्पाचा बृहत आराखडा राबविण्याचे धोरण तयार करण्यासाठी मे.ली असोसिएटस् यांची नियुक्ती करणे संयुक्तिक ठरेल. श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी असे प्रतिपादन केले की, मुख्य अधिकारी, धारावी पुनर्विकास प्रकल्प यांनी धारावी पुनर्विकास परिवहन सुगमतेचा पाठविलेला प्रस्ताव मोनोरेलच्या बृहत् आराखडयात एकत्रिकरणासाठी विचार करण्यात यावा. तसेच या बृहत योजनेमध्ये वांद्रे-कुर्ला संकुल आणि वडाळा परिसरास जोडण्याचाही अंतर्भाव करण्यात यावा. त्यांनी असेही सुचित केले आहे की, मोनोरेल बरोबर विविध परिवहन सेवेलाही एकीकृत करण्यात यावे. तसेच मोनोरेल प्रकल्पामुळे रस्त्याच्या वाहतुकीवर कसा परिणाम होईल याचा तपशिलवार अभ्यास करण्यात यावा. श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी या बृहत आराखडयाबाबत खालील दोन मुद्दे सुचविले आहेत.

अ) प्राथमिक अभियांत्रिकी सुसाध्यता अभ्यास आणि मोनोरेलच्या मार्गाबाबतच्या समस्या (Problem of Right of Way)

ब) प्राथमिक पर्यावरण आघाताचा अभ्यास

मे.ली असोसिएटस् यांनी या कामासाठी रु.४८.५० लाख + सेवा कर असा देकार १०० कि.मी. मार्गासाठी दिलेला आहे. तसेच बृहत आराखडा कामाचा आदेश दिल्यापासून ४ महिन्यात पूर्ण करण्याचा प्रस्ताव आहे.

९.३ त्यानंतर, बाब टिपण्णीवर सविस्तर चर्चा होऊन खालील ठराव कार्यकारी समितीने मंजूर केला.

**ठराव क्र. ११११६ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई महानगर प्रदेशाकरीता मोनोरेल प्रकल्पाचा बृहत आराखडा तयार करण्यासाठी व टप्पा राबविण्याचे धोरण ठरविण्यासाठी मे.ली असोसिएट्स यांची रु.४८.५० लाख + सेवा कर या फी वर एकमेव स्त्रोत म्हणून नेमणूक करण्यास मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१० : मुंबई महानगर प्रदेशात पायाभुत सुविधा प्रकल्प राबविणे - मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व आय.डी.एफ.सी. प्रोजेक्ट्स लि. यांच्यामध्ये सामंजस्य करार करणेबाबत.**

मा.अध्यक्षांच्या परवानगीने सदर बाब मागे घेण्यात आली.

**बाब क्र.११ : प्राधिकरणाकडील असलेला अतिरिक्त निधीचा गुंतवणूक अहवाल - दिनांक १ ऑक्टोबर, २००८ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २००८.**

दिनांक १ ऑक्टोबर, २००८ ते दिनांक ३० नोव्हेंबर, २००८ पर्यंतच्या प्राधिकरणाकडील अतिरिक्त निधीच्या गुंतवणूक अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

..२२/-

**<u>बाब क्र.१२</u> : <u>मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी : सहामाही व्यवस्थापन अहवाल दिनांक १ एप्रिल, २००८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००८.</u>**

मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधीच्या दिनांक १ एप्रिल, २००८ ते दिनांक ३० सप्टेंबर, २००८ पर्यंतच्या अहवालाची नोंद कार्यकारी समितीने घेतली.

**<u>बाब क्र.१३</u> : <u>मुंबई महानगर प्रदेशाकरीता विद्यमान भू-वापर नकाशा तयार करणे व त्याकरीता आवश्यक असलेल्या सॅटेलाईट इमेजेस प्राप्त करण्याकरीता पुणे येथील सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क या संस्थेला नियुक्त करणेबाबत.</u>**

१३.१ महानगर आयुक्तांनी माहिती देताना असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेशाकरीता विद्यमान भू-वापर नकाशा तयार करण्याकरीता आणि त्याकरीता आवश्यक असलेल्या सॅटेलाईट इमेजेस प्राप्त करण्याकरीता पुणे येथील सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्क या संस्थेला नियुक्त करण्याबाबतचा हा प्रस्ताव आहे. त्यांनी प्रस्तावाबाबत थोडक्यात माहिती दिली. श्री.द.म.सुकथनकर, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सुचना केली आहे की, बृहन्मुंबई महानगरपालिका सुध्दा मुंबई शहराकरीता सॅटेलाईट इमेजेसचे काम करीत आहे. त्यामुळे प्राधिकरणाने पुन्हा त्याच कामाची पुनरावृत्ती होणार नाही याची दक्षता घ्यावी. सदर सुचना महानगर आयुक्त यांनी मान्य केली. प्राधिकरणाद्वारे प्रादेशिक योजना तयार करण्याच्या अनुषंगाने प्रादेशिक स्थुल स्तरावरील सॅटेलाईट इमेजेस व विद्यमान भू-वापर नकाशा तयार करण्यात येणार आहे. त्यामुळे बृहन्मुंबई महानगरपालिकेद्वारे सुक्ष्म स्तरावर होत असलेल्या कामाची पुनरावृत्ती होत नाही. सदर कामे पुणे येथील सायन्स ॲन्ड टेक्नॉलॉजी पार्क या संस्थेद्वारे करुन घेण्यात यावे असे ठरले.

**१३.२** त्यानंतर कार्यकारी समितीने बाब टिपणीतील प्रस्ताव मान्य करुन खालील ठराव मंजूर केला.

**ठराव क्र. १११७ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे – (अ) मुंबई महानगर प्रदेशाकरीता विद्यमान भू-वापर नकाशा तयार करण्याकरीता सॅटेलाईट ईमेजेस प्राप्त करणे व त्याकरीता रु.५० लाख इतकी ठेव रक्कम पुणे येथील सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क या संस्थेला देण्यास कार्योत्तर मंजूरी देत आहे आणि (ब) मुंबई महानगर प्रदेशाकरीता विद्यमान भू-वापर नकाशा तयार करण्याचे पुढील काम पुणे येथील सायन्स अँड टेक्नॉलॉजी पार्क या संस्थेला एकमेव तत्वावर (on sole source basis) बाब टिप्पणीमध्ये नमूद केल्याप्रमाणे रु.१.९७०६ कोटी (रु.५० लाख ठेव रक्कमेसह आणि लागू असलेल्या इतर करांसह) इतक्या खर्चाने नियुक्त करण्यास मंजूरी देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१४ : मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत कल्याण-डोंबिवली महानगरपालिकेला भूयारी मलनिःसारण आणि पावसाळी पाण्याची निचरा व्यवस्था या प्रकल्पांसाठी कर्जसहाय्य देणे.**

सदर बाब टिप्पणी दिनांक १० फेब्रुवारी, २००९ रोजी झालेल्या प्राधिकरणाच्या १२४ व्या बैठकीत मंजूर करण्यात आली. यास्तव सदर बाब मा.अध्यक्षांच्या परवानगीने मागे घेण्यात आली.

**बाब क्र.१५ : मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती सर्व सामान्य नागरिक व प्रकल्पग्रस्तांपर्यंत प्रभावीरित्या पोहचविण्याकरीता जनसंपर्क सल्लागार संस्थेच्या नियुक्तीस कार्योत्तर मंजूरी मिळण्याबाबत.**

१५.१ महानगर आयुक्तांनी या बाब टिपण्णीबाबत थोडक्यात माहिती दिली. त्यांनी असे सांगितले की, कृपया कार्यकारी समितीने सदर बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र.१ मध्ये दर्शविल्याप्रमाणे मे.संपर्क पब्लिक रिलेशन प्रा.लि. या जनसंपर्क सल्लागार संस्थेस माहे जून, २००७ ते नोव्हेंबर, २००७ पर्यंत ६ महिने मुदतवाढीस व त्यावर रु.३ लाख प्रतिमाहप्रमाणे एकूण रु.१८ लाख खर्चास कार्योत्तर मंजूरी द्यावी.

१५.२ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन पुढील ठराव मंजूर केला :-

ठराव क्र. ११९८ :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे राबविण्यात येत असलेल्या विविध प्रकल्पांची माहिती अधिकाधिक प्रभाविरित्या सर्वसामान्य नागरिक व प्रकल्पग्रस्तांपर्यंत पोहोचविण्याकरीता मे.संपर्क पब्लिक रिलेशन प्रा.लि. या जनसंपर्क सल्लागार संस्थेस जून, २००७ ते नोव्हेंबर, २००७ पर्यंत ६ महिने मुदतवाढीस व त्यावर रु.३ लाख प्रतिमाहप्रमाणे एकुण रु.१८ लाख खर्चास याद्वारे कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

..२५/-

<u>बाब क्र.१६</u> : <u>मुंबई जलद परिवहन व्यवस्था - चारकोप-वांद्रे-मानखुर्द छन्नमार्गाला बांधा, स्वामित्व घ्या, वापरा व हस्तांतरीत करा या तत्वावर राबविण्यासाठी नमुना सवलत करार (मॉडेल कन्सेशन ॲग्रीमेंट) व मॅन्युअल ऑफ स्पेसिफिकेशन व स्टॅन्डर्ड्स तयार करण्यासाठी मे.लुईस बर्जर यांना सल्लागार म्हणून नेमणूक करण्यासाठी कार्योत्तर मंजूरीसाठी प्रस्ताव.</u>

**१६.१** महानगर आयुक्तांनी याबाबत माहिती देताना असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने लाईन-२ मध्ये चारकोप-वांद्रे-मानखुर्द हा छन्नमार्ग (३२ कि.मी.) बांधा, स्वामित्व घ्या, वापरा व हस्तांतरीत करा/सार्वजनिक खाजगी सहभाग तत्वावर राबविण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे जागतिक स्तरावर निविदा दिनांक १८ फेब्रुवारी, २००७ रोजी मागविण्यात आल्या. महाराष्ट्र शासनाकडून भारत सरकारकडे व्यवहार्य तफावत निधीसाठी दिनांक १६ नोव्हेंबर, २००६ रोजी विनंती करण्यात आली. त्यानुसार भारत सरकारने दिनांक ७ फेब्रुवारी, २००७ रोजी काही आवश्यक पात्रता नमूद करुन हया प्रकल्पाला तत्वतः मान्यता दिली. त्या आवश्यक पात्रतेमध्ये नमुना सवलत करार/मॉडेल कन्सेशन ॲग्रीमेंट (MCA) हे समाविष्ट करण्यात यावे, असे ठरविण्यात आले.

**१६.२** महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, मे.लुईस बर्जर यांना उपरोक्त कामासाठी सल्लागार फी म्हणून रु.३७.५८ लाख + सेवा कर एवढया रक्कमेवर सल्लागार म्हणून नेमणूक करण्याच्या मान्यतेसाठी विचारार्थ प्रस्ताव कार्यकारी समितीच्या कार्योत्तर मंजूरीसाठी सादर करण्यात येत आहे.

**१६.३** त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन खालील ठराव मंजूर केला.

<u>ठराव क्र. ११९९</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मे.लुईस बर्जर यांना रु.३७.५८ लाख + सेवा कर एवढया रक्कमेवर अंतिम सवलत करार, मॅन्युअल ऑफ स्पेसिफिकेशन व स्टॅन्डर्ड आणि निविदा कागदपत्र तयार करण्यासाठी सल्लागार म्हणून नेमणूक करण्यास कार्योत्तर मान्यता देण्यात येत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१७ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत महाकाली केव्हज रस्त्याचे बांधकाम व रुंदीकरण - वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.**

**१७.१** महानगर आयुक्तांनी या बाब टिपणीच्या परिच्छेद क्र.१, २ व ३ बाबत माहिती सांगितली. त्यानंतर त्यांनी प्रस्तावाबाबत खालील थोडक्यात माहिती दिली.

**१७.२** महाराष्ट्र शासनाद्वारे मंजूर ASIDE योजनेअंतर्गत महाकाली रस्त्याचे काम २००४ साली हाती घेण्यात आले होते व त्यासाठी रु.७,९२,४१,०१०/- किंमतीच्या लघुत्तम निविदा मे.विशाल अमर (जे.व्ही.) हयांना देण्यात आली होती. बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या काही अटींमुळे पूलाची लांबी वाढल्यामुळे तसेच काही अतिरिक्त कामे करावी लागल्यामुळे व संपूर्ण कामावर देण्यात येणारी भाववाढ यामुळे कामाची सुधारीत किंमत वाढून रु.११,२७,७९,२८९.५० झाली आहे. ज्यापैकी मूळ किंमतीच्या २०% रक्कम धरुन सुधारीत किंमत रु.९,४८,७१,०८०/- या रक्कमेस महानगर आयुक्त यांनी मंजूरी दिली असून उर्वरीत रक्कम रु.१,७७,१०,३६५/- कार्यकारी समितीच्या मान्यतेकरीता प्रस्तावित आहे.

**१७.३** श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, वाढलेल्या

खर्चास मंजूरी देताना पुढील मुद्यांचा विचार करण्यात यावा. मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या अभियंत्यांकडून तसेच सल्लागारांकडून याबाबतची खात्री करण्यात यावी की, या आधी पूलाच्या रुंदीस बृहन्मुंबई महानगरपालिकेची मंजूरी घेतली होती की नाही, ती मंजूरी घेतली नसल्यास ती का घेतली नाही याची कारणे नमूद करण्यात यावीत.

१७.४ त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिपण्णीतील प्रस्ताव मान्य करुन खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ११२० :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पाची अंमलबजावणी करण्यासाठी ASIDE योजनेअंतर्गत येणा-या महाकाली गुंफा हया रस्त्याच्या रुंदीकरण व मजबूतीकरणाच्या कामात होणा-या पुढीलप्रमाणे सुधारीत खर्च रु.११,२७,७९,२८९.५० म्हणजे महानगर आयुक्तांनी मंजूर केलेल्या सुधारीत किंमत रु.९,४८,७१,०८०/- वरील वाढीव रु.१,७७,१०,३६५/- रक्कमेस मान्यता देत आहे. सदर रक्कम कंत्राटातील तरतूदीप्रमाणे खर्च करण्यासाठी महानगर आयुक्त यांना आवश्यक ती पुढील कार्यवाही करण्यास याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.१८ :** **मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत (एमयुआयपी) महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाकडून अंमलबजावणी होत असलेल्या १) सुमन नगर, २) टाईम्स ऑफ इंडिया, ३) ठाकूर कॉम्प्लेक्स व ४) बर्फीवाला गल्ली येथील उड्डाणपुलांच्या उर्वरीत कामाच्या बार्बीचे दर २००७-०८ च्या दरसूची व प्रचलित बाजारभावाप्रमाणे सुधारीत करण्याबाबत.**

१८.१ महानगर आयुक्त यांनी बाब टिप्पणीतील परिच्छेद क्र.१, २ व ३ बाबत थोडक्यात

..२८/-

माहिती दिली. त्यांनी असेही सांगितले की, मूळ अंदाजपत्रकानुसार कंत्राटातील कामे नियोजित वेळेमध्ये पूर्ण व्हायला हवी होती. त्या प्रत्येक उड्डाणपूलाचे काम हाती घेताना कामामध्ये खालील नमूद केल्यानुसार अडचणी येत गेल्यामुळे कंत्राटदारांना नियोजित वेळेत काम पूर्ण करणे शक्य झाले नाही. म्हणजेच कंत्राट अटीनुसार कामाची निश्चित प्रगती राखता आली नाही. वरील उड्डाणपूलाच्या कामाच्या कंत्राटाची मूळ मुदत संपली आहे आणि कामे पूर्ण करण्यासाठी कंत्राटदारांच्यामुळे दिरंगाई झालेली नाही. नंतर त्यांनी सदर दिरंगाईस कारणीभूत ठरलेली सर्वसाधारण कारणे सांगितली. त्यानंतर महानगर आयुक्तांनी असेही सांगितले की, सदरहू दर हे सांताक्रुझ-चेंबूर जोडरस्ता आणि जोगेश्वरी-विक्रोळी जोडरस्त्याच्या खर्चावर आधारीत आहे.

**१८.२** या प्रस्तावाबाबत चर्चा करताना श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी सुरुवातीस असे निदर्शनास आणले की, कंत्राटदारांच्या निविदेमध्ये कामाचे बांधकाम करताना सेवावाहिन्या हटविण्यास जर विलंब झाला तर कोणतीही मागणी मान्य करण्यात येणार नाही असे कलम अंतर्भूत आहे. शिवाय अशात-हेने निविदेबाहय मागणी मान्य केल्यास यापुढे विविध कामामध्ये अशा मागण्या करण्यात येतील. शिवाय या मागण्यांचा आवाका सुमारे ५० कोटीपेक्षा जास्त आहे त्यामुळे तो मंजूर करण्याबाबत पूर्ण खातरजमा करणे जरुरीचे आहे.

**१८.३** श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी पुढे असेही मत व्यक्त केले की, जे कंत्राट दोघांनी स्वाक्षरी केले आहे त्या कंत्राटाअंतर्गत कंत्राटातील तरतूदीबाहेरील काहीही ज्यादा अधिदान करणे योग्य होणार नाही. त्यानंतर डॉ.शिरीष संख्ये, सदस्य, कार्यकारी समिती यांनी याबाबत पुढे असे विषद केले की, मार्च, २००८ मध्ये बांधकाम साहित्याचे दर जास्त होते, पण ते आता कमी झाले आहे. त्यामुळे जर सदर मागणी मान्य करावयाची असली तर पुढच्या कामासाठी कमी दर प्रस्तावित करण्यात यावेत. श्री.मिराणी यांनी याबाबत पुढे असेही सांगितले की, बृहन्मुंबई महानगरपालिकेने काही कामांमध्ये अशा मागण्यांबाबत कंत्राटदाराचा जादा खर्च काय झाला त्याचे मूल्यमापन करुन तेवढीच मागणी मंजूर करण्याचे प्रस्तावित केले आहे. महानगर आयुक्त यांनी

..२९/-

याबाबत असे सांगितले की, सदर काम पूर्ण करण्यासाठी दोनच पर्याय उपलब्ध आहेत. सदर काम बंद करुन विविध कामांसाठी निविदा मागविण्यात याव्यात किंवा कंत्राटदाराची रास्त मागणी मंजूर करावी. यावरुन वेगळा व्यावहारीक तोडगा सध्या तरी दिसून येत नाही. पुनःश्च निविदा मागविल्यास बराच कालावधी लागला असता व काम उशिरा होऊन जनतेला तेवढा काळ वाहतुक कोंडीचा त्रास सहन करावा लागला असता. त्यानंतर डॉ.शिरीष संख्ये, सदस्य, कार्यकारी समिती यांनी अशी सूचना केली की, स्टील आणि सिमेंटच्या किंमती सध्या खाली आलेल्या असून त्या किंमती सन २००४-०५ च्या इतक्या आहेत. त्यामुळे सध्याच्या बाजारभावाचा दर हा लागू करायला पाहिजे.

**१८.४** याबाबत कार्यकारी समितीच्या सदस्यांनी चर्चा करुन सदर बाबीच्या सोडवणूकीसाठी एक समिती गठीत करण्यात यावी व या समितीमध्ये श्री.एन.व्ही.मिराणी, सदस्य, कार्यकारी समिती यांनी प्रस्तावित केलेल्या पुढील ४ सदस्यांपैकी एका सदस्याच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी. ती समिती जो अहवाल प्राधिकरणास सादर करील तो अहवाल प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत मान्यतेकरीता सादर करण्याचा निर्णय घेण्यात आला.

(१) श्री.एस.आर.तांबे, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(२) श्री.पी.एल.बोंगीरवार, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(३) श्री.जी.के.देशपांडे, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) श्री.व्ही.डी.बोरकर, निवृत्त मुख्य अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण

**१८.५** त्यानंतर, कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील प्रस्ताव मान्य करुन खालील ठराव मंजूर केला :-

**ठराव क्र. ११२१ :**

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन,

..३०/-

उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता कार्यकारी समिती याद्वारे, या विषयाच्या सोडवणूकीसाठी एक समिती गठीत करण्यात यावी. तसेच या समितीमध्ये कार्यकारी समितीचे सदस्य श्री.एन.व्ही.मिराणी यांनी प्रस्तावित केलेल्या पुढील ४ सदस्यांपैकी एका सदस्याच्या अध्यक्षतेखाली समिती गठीत करण्यात यावी व सदर समिती जो अहवाल प्राधिकरणास सादर करील तो अहवाल प्राधिकरणाच्या कार्यकारी समितीच्या पुढील बैठकीत मान्यतेसाठी सादर करण्यात यावा.

(१) श्री.एस.आर.तांबे, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(२) श्री.पी.एल.बोंगीरवार, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(३) श्री.जी.के.देशपांडे, निवृत्त सचिव, सार्वजनिक बांधकाम विभाग
(४) श्री.व्ही.डी.बोरकर, निवृत्त मुख्य अभियंता, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण"

**बाब क्र.१९ : अंधेरी-घाटकोपर जोडरस्त्यावरील आर.बी.कदम मार्ग, असल्फा, घाटकोपर (पश्चिम) येथील (via duct) चे बांधकाम**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.२० : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत ना.सी.फडके मार्गावरील साईवाडी जंक्शन येथे पूल बांधणेच्या कामाची निविदा मंजूर करण्याबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.२१ : दि.३०.०६.२००८ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.२२ : मुंबई महानगर प्रदेशात "शास्त्रोक्त सामाईक भरावभूमीच्या" कार्यरत ठेवण्यायोग्य व्यवस्थापनाच्या कामामध्ये विविध प्रकारे सहाय्यभूत होण्यासाठी "नीरी" हया केंद्र शासकीय संस्थेस सल्लागार म्हणून नेमणूक करण्याबाबत.**

**२२.१** महानगर आयुक्तांनी या प्रस्तावाबाबत माहिती देताना असे सांगितले की, मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील ७ महानगरपालिका व १३ नगरपरिषदांसाठी दिर्घ मुदतीच्या

तत्वावर कार्यरत ठेवण्यायोग्य सामाईक भरावभूमीच्या विकासाच्या कामामध्ये विविध प्रकारे सहाय्यभूत होण्यासाठी "नीरी" हया संस्थेस सल्लागार म्हणून एकंदर रु.३४५.४० लाख (१२.३६% सेवाकरासहीत रु.तीनशे पंचेचाळीस लाख चाळीस हजार फक्त) प्रथमतः "दोन वर्षाच्या" कालावधीसाठी नियुक्ती करण्यात यावी. नंतर कार्यकारी समितीने बाब टिप्पणीतील सुधारीत प्रस्तावास मान्यता दिली.

२२.२ सविस्तर चर्चेनंतर कार्यकारी समितीने खालील ठराव मंजूर केला.

<u>ठराव क्र. ११२२</u> :

"**असा ठराव करण्यात येत आहे की,** मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, १९७४ च्या कलम ७ चे उपकलम (३) चे पोटकलम (तीन) अन्वये प्राप्त झालेल्या अधिकारांचा आणि याबाबत त्यास सहाय्यभूत होणा-या इतर सर्व अधिकारांचा वापर करुन, कार्यकारी समिती याद्वारे मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील ७ महानगरपालिका व १३ नगरपरिषदांसाठी दिर्घ मुदतीच्या तत्वावर कार्यरत ठेवण्यायोग्य सामाईक भरावभूमींच्या विकासाच्या कामामध्ये विविध प्रकारे सहाय्यभूत होण्यासाठी "राष्ट्रीय पर्यावरण अभियांत्रिकी संशोधन संस्था" "नीरी" (National Environment Engineering Research Institute) हया संस्थेस सल्लागार म्हणून दोन वर्षाच्या कालावधीसाठी ३४५.४० लाख (रु.तीनशे पंचेचाळीस लाख चाळीस हजार फक्त) एवढया रक्कमेस नेमणूक करण्यास व त्या अनुषंगाने करण्यात येणा-या करारनाम्यांच्या अटींप्रमाणे देय होणा-या संभाव्य बदलांसह अधिदान करण्यास मान्यता देत आहे. तसेच रु.३४५.४० लाख एवढया अंदाजित खर्चास प्रशासकीय मान्यता देत आहे.

"**असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती सर्व कार्यवाही "सामाईक भरावभूमींचा" विकासासाठी व शासनाकडे आवश्यक तो पत्रव्यवहार करण्यासाठी महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे."

**बाब क्र.२३ : मुंबई नागरी परिवहन प्रकल्पांतर्गत मे.रिहॅब हाऊसिंग प्रा.लि. व लार्सन ॲन्ड टुब्रो लि. (भागीदार संस्था) यांच्यामार्फत मौजे मानखुर्द येथील भूखंड क्र.२ब/४अ येथे प्रकल्पग्रस्तांकरीता कायमस्वरुपी घरबांधणी कंत्राटातील अंतिम देयकामधून वजा केलेली रक्कम परत करणेबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले..

**बाब क्र.२४ : महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी (लि.) यांना ठेव देण्याबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.२५ : वडाळा भारवाहक तळ भाग-१ येथील अंतर्गत रस्त्यांचे काँक्रिटीकरण करण्याचे कामासाठी प्रशासकीय मान्यता व निविदेस मंजूरी मिळणेबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.२६ : मुंबई नागरी पायाभूत सुविधा प्रकल्पांतर्गत अंधेरी-घाटकोपर जोडरस्ता (विस्तारीत) वर्सोवा ते पश्चिम द्रुतगती महामार्ग या रस्त्याचे रुंदीकरण व सुधारीकरण.**
**- मंजूर निविदेवरील वाढीव खर्चास मंजूरी देणेबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.२७ :** **मिठी नदी विकास कामांतर्गत टप्पा-२ च्या कामामधील खालील कामांच्या लघुत्तम निविदांना मान्यता मिळणेबाबत.**

(१) मिठी नदीवरील सा.क्र.५४३१ मी. पासून (मिठी पूल) ते सा.क्र.५८८३मी. पर्यंत (सी.एस.टी.पूल) एल.बी.एस.मार्गाच्या बाजूला सविस्तर संकल्पन व भू-गर्भ संशोधन करुन आर.सी.सी. मरीन प्लॅटफॉर्मचे बांधकाम करणे. (अंदाजित किंमत रु.२०५८.०लाख)

(२) वाकोला नाल्यावरील वाल्मिकी नगरच्या बाजूला सा.क्र.१३४५ मी. पासून (नवीन भारतनगर पूल) ते सा.क्र.१६४५ मी. (नवीन वाकोला पूल) सविस्तर संकल्पन व भू-गर्भ संशोधन करुन आर.सी.सी. मरीन प्लॅटफॉर्मचे बांधकाम करणे. (अंदाजित किंमत रु.१९१२.० लाख)

(३) मिठी नदीवरील सा.क्र.०.० मी. पासून (माहिम कॉजवे) सा.क्र.२१४०मी. पर्यंत (समुद्रामध्ये) खोलीकरण व रुंदीकरण करणे. (अंदाजित किंमत रु.२५३३.०लाख)

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**बाब क्र.२८ :** **मुंबई नागरी विकास प्रकल्प - फिरता निधी अंतर्गत उल्हासनगर महानगरपालिकेला पाणी पुरवठा वितरण व्यवस्था या प्रकल्पासाठी कर्ज सहाय्य देणे.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**पटल बाब क्र.१ :** **वांद्रे-कुर्ला संकुलामधील मोनोरेल प्रकल्प - तांत्रिक व वित्तीय सुसाध्यता अभ्यास करण्यासाठी दिल्ली इंटिग्रेटेड मल्टीमॉडेल ट्रान्झिट सिस्टीम लिमिटेड (डी.आय.एम.टी.एस.) यांची नेमणूक करणेबाबत.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

**पटल बाब क्र.२ : दिनांक ३०.०९.२००८ रोजी संपणाऱ्या त्रैमासिक कालावधीचे लेखे.**

या विषयावर विचारविमर्श करण्याचे लांबणीवर टाकण्यात आले.

त्यानंतर, मा.अध्यक्षांचे आभार मानून बैठकीचे कामकाज़ समाप्त करण्यात आले.

******************